अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर
स्टोअर विभाग जा.क्र. - 283
दिनांक.11/12/2025

# अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर
## स्टोअर विभाग
## ई-निविदा सुचना क्रमांक : 06 दि.11/12/2025
## ई-निविदा क्र. - 2025_ANMC_1258390_1

मा.प्रशासक तथा आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका यांचे मान्यतेने खालील नमुद मालाच्या पुरवठयासाठी/कामासाठी ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा मागवित आहे.निविदे बाबतच्या या व्यतिरिक्त असलेल्या अटी व शर्ती निविदा फॉर्म मध्ये नमुद केल्या असुन निविदा फॉर्म विक्री व निविदा प्रक्रियेबाबतचा तपशिल खालिल प्रमाणे.

| Sr.No | Envelopes | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|
| 1) | निविदा विक्री व तयार करणे | 11/12/2025 18:15 | 27/12/2025 18:15 |
| 2) | निविदा स्विकृती | 11/12/2025 18:15 | 27/12/2025 18:15 |
| 3) | तांत्रिक व व्यापारी लिफाफा उघडणे | 29/12/2025 13:00 पासुन | |

| मालाचा / कामाचा तपशिल (संक्षिप्त) | अंदाजित पुर्वगणित रक्कम / मालाचे परिमाण | बयाणा रक्कम रु. | निविदा संच किंमत (ना परतावा) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील राष्ट्रमाता जिजाबाई शहाजीराजे भोसले हॉस्पीटल येथे फर्निचर साहित्य, डिजीटलायझेशन करणेकामी आवश्यक साहित्य व आय.टी.साहित्य पूरवठा करुन सदरचे साहित्य नियुक्त पी.एम.सी.चे सुचनेप्रमाणे प्रत्यक्ष ठिकाणी बसवून फर्निचर व डिजीटलायझेशनचे काम करुन देणेबाबत.<br><br>टिप –<br><br>साहित्य पुरवठा व कामाचा सविस्तर तपशिल निविदा प्रपत्र 'अ' मध्ये नमुद आहे. | 3,26,44,868.00 | 2,00,000.00 | 20,000.00 |

अहिल्यानगर महानगरपालिका उपरोक्त नमुद काम/मालाच्या पुरवठया करिता पुरवठादार/अधिकृत विक्रेते/उत्पादक यांचेकडून निविदा संचातील नमुद अटी व शर्ती नुसार निविदा संचासोबत जोडलेले प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेले काम/माल खरेदीबाबत जाहिर ई-निविदा मागवत आहे.

१२/१२/२०२५

टिप :-

1)सदर माल/कामाबाबत निविदा अटी,शर्ती इ.बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून निविदा संच ऑनलाईन पाहावयास उपलब्ध आहे.तसेच साहित्याचे कामाचे सविस्तर स्पेसिफिकेशन निविदा संचासोबत असलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये नमुद केलेले आहे.

2)सदर कामाची निविदा संच खरेदी किंमत व बयाणा रक्कम स्वतंत्रपणे ICICI बँकेचे खात्यामध्ये ऑनलाईन भरावी लागेल.निविदा संच फि व बयाणा रक्कम हि फक्त ऑनलाईन पध्दतीने अदा करावी लागेल.

3)निविदा संचाची विक्री,सादरीकरण/स्वीकृती https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन चालू आहे.

4)वेबसाईट वरुन निविदामध्ये सहभागी होण्यासाठी वेबसाईटवर युजर आयडी व पासवर्ड बनविणे बंधनकारक आहे.यासाठी किंवा ई-निविदा बावत मार्गदर्शनासाठी 0120-4001002, 0120-4001005 या क्रमांकावर संपर्क करावा.

5)वरील निविदा सादरीकरण/स्वीकृती फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येईल.पेटी पध्दत पुर्णपणे बंद करण्यात आलेली आहे.

6)अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्र.शहर अभियंता किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी समक्ष सदर कामाकरिता कार्यस्थळाची पाहणी करुन त्याबाबतचे त्याबाबतचे Geo-Tagging केल्याचे फोटो अपलोड करणे आवश्यक आहे.सदरचे Geo-Tagging फोटो निविदेच्या तांत्रीक लिफाफा (लिफाफा क्र.01) मधून सादर करणे बंधनकारक आहे.अन्यथा सदर निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

7)वरील निविदा सादरीकरण हे दोन पाकीट पध्दतीने (Technical Bid व Commercial Bid)करणे आवश्यक आहे.निविदा मधील प्रपत्र 'अ' मध्ये दर नमुद करुन सदरचे प्रपत्र व्यापारी लिफाफयामध्ये जोडण्यात यावे.

8)निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑन लाईन सादरीकरण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील.

9)निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी आल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल.

10)पुरवठादाराचे देयक फक्त इसीएस/एनईएफटी दवारेच प्रदान करण्यात येईल.त्यासाठी संबंधीत पुरवठादाराचे कोअर बँकींगची सुविधा असलेल्या बँकेतच खाते असणे बंधनकारक राहिल.

11)निधी उपलब्धते नुसार पुरवठादाराचे देयक अदा करण्यात येतील.

12)पुरवठादारास पुरवठा करण्यात येणा-या साहित्याच्या दर्जाविषयी व कामाचे गुणवत्तेबाबत शासन मान्यता प्राप्त त्रयस्थ (थर्ड पार्टी)संस्थेकडून स्वखर्चाने तपासणी अहवाल सादर करणे बंधनकारक असून अहवाल प्राप्त झाल्याशिवाय देयकाची रक्कम अदा केली जाणार नाही.

13)देयक तयार करताना दोषदायित्वापोटी एक वर्ष कालावधीसाठी 10%रक्कम देयकातून कपात करण्यात येईल व एक वर्ष कालावधीनंतर कामाची/साहित्याची पाहणी करुन काम/साहित्य सुस्थितीत असल्यानंतरच सदरच्या दोषदायित्व रक्कमेचा परतावा करण्यात येईल.

14)कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतीम अधिकार मा.आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका यांना राहतील.

उपायुक्त (कर)
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत - मा.प्रशासक तथा आयुक्तसाहेब,अहिल्यानगर महानगरपालिका,यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
प्रत - मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब,अहिल्यानगर महानगरपालिका,यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर
प्रत - मा.उपायुक्त (सा.),अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - मा.उपायुक्त (कर),अहिल्यानगर महानगरपालिका,
प्रत - संगणक विभाग प्रमुख,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस महानगरपालिका वेबसाईट वर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.
प्रत - ई-निविदा कक्ष प्रमुख,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.
प्रत - हवलदार,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस महानगरपालिका नोटीस बोर्डवर डकवून प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.